MHRG160000922019

**नियमित दिवाणी दावा क्र. १४/२०१९**
**निशाणी क्र. २३ वरील आदेश**
( पारित दि.२४/०७/२०२३)

०१. वादीने प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारसांविरुद्ध झालेली अबेटमेंट रद्द करुन मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ०२ श्रीमती वनिता वसंत जाधव हया दि. १५/०५/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. दरम्यानच्या काळात कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे वादी यांना वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. त्यामुळे झालेली अबेटमेंट रद्द करुन मिळावी अशी वादींची मागणी आहे.

०२. प्रतिवादीने वादीच्या अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदवली आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वारस पुर्ततेस विलंब झाला आहे. केवळ अबेटमेंटचा अर्ज चालत नाही.

०३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जास प्रतिज्ञापत्राद्वारे आधार दिला जातो. अर्जाच्या पुष्टयर्थ सुहास पवार याने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. मृत्युच्या दाखल्याची प्रत नि. क्र. २८ लगत दाखल केलेली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ०२ वनिता वसंत जाधव हया दि. १५/०५/२०२० रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर दिसून येते. वास्तविक ९० दिवसांच्या आत अर्ज दाखल करावा लागतो. निश्चितच अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. परंतु सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने दाव्याचा

निकाल गुणदोषावर होणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे मी आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज नि. क्र. २३ विधी सेवा समिती पाली यांचेकडे रुपये ५००/- भरणेचे अटीवर मंजूर करणेत येते.

MEENA WAMAN JADHAV

Digitally signed by MEENA WAMAN JADHAV
Date: 2023.07.28 17:39:41 +0530

**ठिकाणः पाली** **(मिना वामन जाधव)**

**दिनांक : २४/०७/२०२३** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाली.**